# ठाणे महानगरपालिका, ठाणे

## करनिर्धारणाबाबत - आक्षेप नोंदविण्यासाठी

## जाहीर नोटीस

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूचीतील प्रकरण ८ मधील नियम १०, १३(१), १४ व १५(१) अन्वये तसेच महाराष्ट्र ( मोठ्या निवासी जागा असलेल्या ) इमारतीवरील कर अधिनियम १९७९ कलम १०(१) अन्वये**

ठाणे महानगरपालिकेच्या सर्व प्रभाग क्षेत्रातील सर्व मालमत्ता धारकांस / भोगवटा धारकांस कळविण्यात येते की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कराधान प्रकरण ८ चे नियम , १३(१), १४ व १५(१) अन्वये तयार करण्यात आलेला आकारणी तपशील आणि महाराष्ट्र (मोठ्या निवासी जागा असलेल्या) इमारतीवरील कर (पुन्हा अधिनियम करणे) अधिनियम १९७९ चे कलम १०(१) अन्वये ठाणे महानगरपालिकेच्या हद्दीतील मिळकतीचे करयोग्य मूल्य व ठामपा हद्दीतील मोठ्या निवासी जागा असलेल्या इमारती आणि त्यांचे करयोग्य मूल्य दर्शविणारा सन २०१९-२० या कालावधीचा कर आकारणी तपशील संबंधित प्रभाग कार्यालय व उप प्रभाग कार्यालयात दिनांक ०१/०४/२०१९ ते २२/०४/२०१९ पर्यंत कामाच्या दिवशी व वेळेत संबंधितधारक / अधिकृत व्यक्तींना उपलब्ध करण्यांत आले आहेत. त्यावर हरकती मागविण्यात येत आहेत.

**<u>हरकती खालील मुद्यांवर घेता येईल :-</u>**

१. इमारतीचे व जमिनीचे करयोग्य मूल्य चुकीचे नोंदविले असल्यास.
२. घर क्रमांक अथवा मिळकत मालकाचे / धारकाचे नांव चुकीचे नोंदविले असल्यास.
३. इमारत अथवा जमिनीवर मालमत्ता कर देण्यांस जबाबदार असलेल्या व्यक्तीचे नांव चुकीचे नोंदविले असल्यास.
४. जमिनी अथवा इमारतीचे भाडे मूल्यात वाढ अथवा घट केली असल्यास
५. इमारत अथवा तिचा काही भाग पाडून टाकला असल्यास किंवा इमारत अस्तित्वात नसल्यास.
६. मिळकतीच्या वापरात बदल केला असल्यास.
७. इमारतीच्या क्षेत्रफळात वाढ अथवा घट केली असल्यास,

केवळ उपरोक्त मुद्यांसंदर्भात हरकत असल्यास, मिळकत जया प्रभाग/कार्यक्षेत्रात आहेत त्याक्षेत्राकरिता असलेल्या प्रभाग/कार्यालयाच्या पत्यावर उपआयुक्त (परिमंडळ)...................प्रभाग समिती कार्यालय, ठाणे महानगरपालिका, ठाणे यांचे नावे विहित मुदतीत कागदोपत्री पुराव्यांसह लेखी अर्ज सादर करावेत.

दिनांक ०१.०४.२०१९ पूर्वी आणि दिनांक २२.०४.२०१९ नंतर आलेल्या तसेच अन्य स्वरुपातील अन्य ठिकाणी दाखल केलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. तसेच प्रत्येक मिळकतीसाठी स्वतंत्रपणे अर्ज करावा.

तथापि, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कराधान प्रकरण ८ कलम १ ते ४ अन्वये इमारतीचा / मिळकतीचा मालमत्ता कर भरण्याची जबाबदारी हस्तांतरणाची नोंद करण्याकरिता संबंधित सहाय्यक आयुक्त यांचेकडे विहित नमुन्यात स्वतंत्रपणे कधीही रितसर अर्ज करता येईल. मात्र हरकत अर्जाच्या स्वरुपामध्ये त्याचा विचार केला जाणार नाही.

(ओमप्रकाश दिवटे)
उपआयुक्त (कर)
ठाणे महानगरपालिका, ठाणे

टिप :- हरकत अर्जात मिळकतीचा मालमत्ता ग्राहक क्रमांक, वसुली ब्लॉक क्रमांक, मिळकतीचा संपुर्ण पत्ता व पत्रव्यवहाराचा पत्ता, ई-मेल आयडी तसेच संपर्कासाठी मोबाईल नंबर नमूद करणे, तसेच सन २०१८-१९ ची संपूर्ण मागणी रक्कम अदा केल्याची पावती प्रत पुरावा सोबत जोडणे अनिवार्य राहील.